## पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन

मंगल माने

श्री गजाननाचा वरदहस्त ज्या थोर पुरुषाला लाभला, ते पुण्यश्लोक ब्रह्मीभूत श्रीहरिभटबुवा (अथवा हरभटजीबुवा) पटवर्धन हे सांगलीचे संस्थापक श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे पणजे होत. हे पटवर्धन घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवडे (कर्यात नेवरे) येथील राहणारे. कोतवडे गांवच्या ग्रामोपाध्येपणाची वृत्ती या पटवर्धन घराण्याकडे होती. त्याशिवाय कोतवड्याचे खोत, सहस्त्रबुद्धे यांचे कुलोपाध्यायपणही पटवर्धनांकडेच होते.

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब यांचा जन्म पौष शु. ४, शके १९९६ (ता. ५-१-१९७५) गुरूवारी मिरज किल्ल्यात झाला. त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई उर्फ बाई या पुणे येथील भिडे सावकार घराण्यातील बाळाजी नाईक यांच्या कन्या होत. पांडुरंगराव तात्या यांच्या तिघां पुत्रांपैकी चिंतामणराव हे दुसरे पुत्र होत. चिंतामणराव दोन-तीन वर्षाच असतानाच त्यांचे वडील स्वर्गवासी झाले त्यामुळे वडिलांच्या शिकवणीचा लाभ त्याना झाला नाही. पुढे चिंतामणराव आप्पासाहेब यांना माघ शु. ५ शके १७०४ (ता. ६-२-१७८३) गुरूवारी सरदारकीची वस्त्रे देण्यात आली. शिरस्त्याप्रमाणे कंठी, शिरपेच व हत्ती देण्यात आला. यावेळी चिंतामणराव फक्त आठ वर्षाचे असल्याचे घरचा व दौलतीचा कारभार त्यांचे चुलते गंगाधरराव बाळासाहेब महात आणि पेशवे सरकारशी होणारा पत्रव्यवहार चिंतामणराव यांचेतर्फे परशुराम पहात असत.

पुढे शके १७०७ (ता. १२-१२-१७८५) मार्गशीर्ष शु. १० सोमवार चिंतामणरावांचा विवाह हरिहरपंत तात्या फडके यांच्या नातीशी (बाबासासाहेब फडके यांच्या कन्येशी) झाला आणि चिंतामणरावांचे चुलत बंधू केशव दाजी (गंगाधरराव बाळासाहेब यांचा मुलगा) यांना हरिपंत फडके यांनी आपली मुलगी दिली. ही दोन्ही कार्ये एकाच महिन्यात पुण्यास झाली. हरिपंत फडके लष्करी कामगिरीवर असल्याने ते या विवाहसमारंभास हजर नव्हते. चिंतामणरावांच्या पत्नीचे नाव यशोदाबाई ठेवण्यात आले.

यापुढे चिंतामणराव आप्पासाहेब हे या परिस्थितीमुळे मिरजेस फारसे न राहता तासगावी परशुरामभाऊंच्याकडे पुष्कळदा राहात आणि आपली कहाणी वेळप्रसंग पाहून त्यांचे कानावर घालीत. परशुरामभाऊंच्यामागे स्वारीशिकारीची व पुण्यातील राजकारणाची बरीच कामे असत. तरी मिरजेच्या गृहकलहांत त्यांनी लक्ष घातले. गंगाधरपंत व चिंतामणराव या चुलत्या-पुतण्यांचे आता एकत्रित राहणे अशक्य आहे, असे त्यांना दिसून आले आणि म्हणून त्यांनी गंगाधरपंतांना पत्र पाठवून जहागिरीची फारकत करण्याचा सल्ला दिला परशुरामभाऊंचे चिरंजीव रामचंद्र आप्पा यांनीही गंगाधरपंतांना पत्र लिहून समक्ष भेटून चुलत्या-पुतण्यांची वाटणी करणेचा सल्ला दिला. पण गंगाधरपंतांनी तोंडापुरते हो हो म्हणून, व्यवहारात हरेक गोष्ट लांबणीवर टाकण्याचा क्रम चालूच ठेवला आणि वाटणीचे भिजत घोंगडे तसेच पडून राहिले. यामुळे परस्परांची मने कलुषित होत चालली.

त्यावेळी म्हणजे १७९८ च्या सुमारास दक्षिण भागात शिंदे बाया व करवीरकर महाराज यांनी धुमाकूळ घालण्यास सुरवात केली आणि त्याच्या बंदोबस्ताकरिता परशुरामभाऊ आपल्या दोघां पुत्रांसह सावनूर व गोकाक या भागात आपली ठाणी वसवीत गेले. गुलबर्ग्याचे ठाणे बसविण्यासाठी परशुरामभाऊंना आपल्या तलवारीचे पाणी शत्रूला दाखवावे लागले. दरम्यान धोंडजी वाघांचा कर्नाटकात दंगा (सन १८०० मध्ये) सुरु झाला. पटवर्धनांचे सरंजाम महाल, पेशव्यांचा मुलूख व टिपूच्या राज्यापैकी इंग्रजांच्या ताब्यात असलेला मुलूख यांस तो उपद्रव देऊ लागला. पेशव्यांनी वाघाचे बंदोबस्ताकरता आपला फौजफाटा पाठविला. चिंतामणराव आप्पा निघाले; इंग्रजांतर्फे मद्रासहून

जनरल वेलस्ली आले होते; पेशव्यांचे वहिवाटदार धोंडोपंत गोखले उभयता पुण्यास निघाले. या मोहिमेत वाघाच्या बंडाळीमुळे चिंतामणरावांना आपल्या गृहकलहाकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाही.

धोंडजी वाघावरील स्वारीत चिंतामणराव आप्पासाहेब यांना बऱ्याच जखमा झाल्याने दुसरे बाजीराव पेशवे यांनी त्यांना पुण्यास बोलावून त्यांचा बहुमान केला व त्यांच्या आप्तेष्टांकडून त्यांचे कौतुक झाले. त्यांच्या लढाऊ सामानाचे बरेच नुकसान झाले पण सरदार म्हणून त्यांची प्रतिष्ठा वाढली. याचा उपयोग त्यांचा हिस्सा तुटक होणेच्या कामी बराच झाला. रामचंद्रराव तासगावकर यांनी मिरजेस असलेली नगारा–निशाण वगैरे राजचिन्हे, चिंतामणराव केव्हा तरी जबरदस्तीने घेऊन जातील, या भितीने ती त्यांनी तासगांवास आपल्याजवळ नेऊन ठेवली. आपण वडील तेव्हा आपल्या पोटांतील भाऊबंदांनी पेशवे सरकारची चाकरी करावयाची. या चिंतामणरावांच्या आग्रहामुळे, त्यांना त्यांच्या भाऊबंदांची सहानुभूति लाभणे शक्य नव्हते.

**सांगली नांवाची उपपत्ती :**

पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष श्री हरिभटजीबाबा यांचे पुत्र गोविंद हरि हे सांगली–मिरज शाखेचे मूळ पुरुष होय. गोविंद हरी यांचे पथकाचे सरंजामास पंचवीस लक्षांचा मुलूख पेशवे सरकारांतून देणेत आला. त्यांत मिरजप्रांत हा एक परगणा होता. या मिरज प्रांताचे ठाणे मिरज हे असून त्या प्रांतात पूर्वी बावीस कर्याती होत्या. (जवळजवळ असलेल्या तीन चार गावांना एक कर्यात म्हणत) त्यातील मोठ्या गांवावरून त्या कर्यातीस नांव दिले जाई. या बावीस कर्यातीपैकी सांगली ही एक कर्यात होती. सांगली हा गाव मिरज या मुख्य ठिकाणापासून सुमारे ६ मैलावर कृष्णातीरी एका उंचवट्यावर बसलेला आहे. त्यावेळी या गावी (म्हणजे आताच्या जुन्या सांगलीत) सुमारे सहा गल्ल्या असल्याने त्यास सांगली असे नाव पडले असावे अशी काही लोकांची समजूत आहे. काहीचं म्हणणं असे की सांगलीचे नाव पूर्वी संगली असे कर्नाटकी पद्धतीचे होते. तर दुसऱ्या काही लोकांची कल्पना अशी की, संगमी याचा अपभ्रंश सांगली असा झाला असावा. कृष्णा व वारणा या दोन नद्यांचा संगम या गावानजीक असल्याने संगमी या नावाची उपपत्ती लावली जाते व ती अधिक सोपपत्तिक आहे. जुन्या सांगलीजवळ श्री कृष्णामाईस घाट बांधलेला आहे. (त्यास विष्णूचा घाट म्हणतात.) त्याचे अगदी नजीक प्राचीन काळातील वैष्णवस्वामीचे एक वृंदावन आहे. तो भाग तपोवन या नावाने ओळखला जातो तेथे पूर्वी सप्तऋषींनी तप केले होते म्हणून त्याला 'तपोवन' नाव पडले अशी आख्यायिका आहे.

विजापूरचे बादशहाच्यावेळी सांगली हा गाव वैष्णव सांप्रदायाचे उत्तरादि मठाकडे इनाम होता म्हणून तेथे तपोवनात उत्तरादि मठाचे वैष्णवस्वामी सत्यव्रततीर्थ यांचे वृंदावन (समाधी) आहे. १७ व्या शतकाच्या अखेरीपासून वैष्णव सांप्रदायात हा गाव क्षेत्राप्रमाणे मानला जात आहे. शिवाय, कृष्णेचा आणि वारणेचा संगम या गावाजवळची भूमी पवित्र समजली जात असल्याने सांगली हे क्षेत्र मानले जात आहे. पुढे काही वर्षांनी सांगली गावचे ऐवजी उत्तरादिमठाचे स्वामींनी दुसरा गाव इनाम मिळविला व त्यांनी सांगली गाव सोडून दिला.

चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन हे सांगली संस्थानचे संस्थापक राजे होत. त्यांनी इ. स. १८०१ मध्ये येथे 'गणेश दुर्ग' राजवाड व श्री गणपती मंदिर बांधण्यास सुरुवात केली. पेशवेकालीन (इ. स. १७००) मराठा साम्राज्याच्या चार आधारस्तंभापैकी पटवर्धन घराणे हे एक होते. पहिले चिंतामणराव हे वयाच्या १७ व्या वर्षी टिपू सुलतानच्या विरुद्ध पहिल्यांदा लढले होते. ते पायदळाशिवाय १० हजार घोडदळाचे प्रमुख, सेनापतीही होते.
पहिल्या चिंतामणराव पटवर्धनांनी जरी हैदरअली व टिपू सुलतानविरुद्ध लढाई केली असली तरी त्यांची धर्मातीत म्हणून असलेली ख्याती वादातीत होती. त्यांनी सांगली संस्थानातील मुसलमान प्रजेला न्याय्य व सन्मानाची

वागणूक दिली. त्यांनी मशिदीसाठी जमीन नेमून दिली आणि राजधानी सांगलीजवळील नांद्रे येथील त्या समाजाच्या उरूस प्रसंगी ते स्वत: सहभागी होत असत. शिवाय श्री गणपती देवस्थानातील देवतांच्या पंचायतन मंदिरासमोर त्यांनी संस्कृत व उर्दू भाषेत नावे लिहिली आहेत. संस्थेच्या तेरदाळ तालुक्यात (परगणा) उर्दू ही कार्यालयीन कामकाजाची भाषा तेथील शाळेमध्ये शिकवली जात होती. ज्याप्रमाणे भरताने प्रभु रामचंद्राच्या नावाने राज्यकारभार पाहिला. तसा ते श्री गजाननाच्या नावे संस्थानचा कारभार पाहात होते.

पहिले चिंतामणराव हे योद्धे होते. तसेच ते कुशल प्रशासकही होते. सांगलीसह संस्थानात व्यापार–उदीम वाढावा, असा त्यांनी प्रयत्न केला. त्यानुसार बाजारपेठा वसवल्या. सांगलीत १८२१–२२ मध्ये त्यांनी छापखाना सुरू केला. ब्रिटीश–अफगाण युद्धाची माहिती सांगलीत सतत मिळाली. यासाठी त्यांनी यंत्रणा उभी केली होती. सुमारे पावणे दोनशे वर्षापूर्वीचा माहिती तंत्रज्ञानाचा तो एक अभिनव प्रयोग होता. पहिल्या चिंतामणरावांनी १८५१ पर्यंत राज्यकारभार पाहिला. त्यांच्या नंतर त्यांचे पुत्र धुंडिराजराव यांनी १८५१ ते १९०१ पर्यंत राज्यकारभार केला. मुंबई येथे जे. जे. हॉस्पिटल १८५१ साली सरू झाले. त्यानंतर थोड्याच काळात १८५५ साली त्यांनी सांगलीत विदेशी धरतीचे हॉस्पिटल सुरू केले. त्यांनी महसूल नोंदीची कामे १८६० ते १८७० या काळात अद्यावत केली होती. तर ब्रिटीश अंमलाखालील उर्वरित भारताच्या महसुलाच्या नोंदी ब्रिटीशांनी १९२० ते १९३० या काळात पूर्ण केल्या. यामुळे सांगली हे एक प्रगतीशील संस्थान म्हणून महाराष्ट्रभर ओळखले जाऊ लागले. सांगली संस्थानात ऊस हे एक महत्त्वाचे पीक होते व इतर नगदी पिकात कापूस, द्राक्षे व हळद ही प्रमुख पिके होती. हळद ही तर तेव्हा जगप्रसिद्ध बाजारपेठ होती ती आजही आहे.

धुंडिराज महाराजांच्या कारकीर्दीत सांगली नगरपालिका, सांगली नगरवाचनालय, इंग्लिश स्कूल व संस्कृत पाठशाळा सुरू झाल्या. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाला सुमारे एकशेचाळीस वर्षापूर्वी सांगली संस्थानात सुरुवात झाली होती. मागासवर्गीय, मुस्लिम आणि मुलींसाठी शिक्षणाकरिता मोफत शिक्षण, विशेष अनुदान व बक्षीस योजना त्यांनी सुरु केली. त्यांच्या पश्चात दुसरे चिंतामणराव हे गादीवर आले. त्यांच्या कारकिर्दीत इंजिनिअरिग व मेडिकल कॉलेजची स्थापना झाली. सांगली संस्थानात १९३५ पासून विधानसभा आस्तित्वात होती. तसेच न्याय अथवा विधी व प्रशासन हे दोन स्वतंत्र विभाग आस्तित्वात होते म्हणजे भारतात लोकशाही शासन सुरू होण्यापूर्वी १७ वर्षे अधिच सांगली संस्थानात लोकशाही आस्तित्वात होती. भारतातील एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून ते ओळखले जाऊ लागले. ब्रिटीश सरकारनी ११ तोफांची सलामी बहाल केलेली संस्थान असे जाहीर केले व त्या सोबत प्राप्त होणारे मानमतराब व अधिकार प्रदान केले शिवाय हिज हायनेस ही उपाधी बहाल केली. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पद्मभूषण किताब देऊन त्यांना सन्मानित केले.

विजयसिंहराजे पटवर्धन हे चौथे राजे म्हणून दुसऱ्या चिंतामणरावानंतर राजगादीवर विराजमान झाले आहेत. त्यांचे खापर पणजोबा. पहिले चिंतामणराव तेही स्वकर्तृत्वावर भविष्याचा वेध घेत आहेत. त्यांनीसुद्धा आपल्या दैवताची श्री गजाननाची शपथ घेतली आहे की ते आपल्या पूर्वजांच्या नावलौकिकास साजेसे कार्य करण्यात धन्यता मानतील व श्री गजाननाच्या वैभवात यथाशक्ती भर टाकतील. त्यादिशेने त्यांनी कारंजी, पदपथ, सुशोभित उद्याने आदी केलेली कामे आपल्या नजरेस येत आहेत. यांच्या आजोबांनी सुरू केलेली श्री गणपती मंदिराच्या भव्य महाद्वाराचे कार्य त्यांनी पूर्ण केले आहे व एक सुंदर वास्तुशिल्प म्हणऊन ते दिमाखात उभे आहे. ऑगस्ट २००२ मध्ये त्यांच्या ६० व्या वाढदिवशी त्यांनी अन्नछत्र सुरू केले आहे. कोणाही गोरगरीबाला सांगलीत उपाशीपोटी झोपावयास लागू नये म्हणून 'राजे विजयसिंहराजे प्रतिष्ठान' मार्फत हे अन्नछत्र चालविले जाते. त्यांच्या खापरपणजोबांनी पहिल्या चिंतामणरावांनी जेथून २०० वर्षापूर्वी राज्यशकट चालविला त्या दरबार हॉलची पुनर्बांधणी त्यांनी केली व

त्याठिकाणी आपल्या पूर्वजांच्या आठवणी प्रीत्यर्थ पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचा १४ फूट उंचीचा देखणा पुतळा उभारला आहे.

पहिल्या चिंतामणरावांना ७६ वर्षाचे आयुष्य लाभले. चिंतामणरावांना आपल्या ७६ वर्षांच्या दीर्घायुष्यात पेशवाईचा उत्कर्ष, पेशवाईचा पडता काळ आणि मराठी राज्याचे शेवट पाहणे त्यांच्या नशिबी आले. पेशवाईतील त्यांची शिपाईगिरी नष्ट होऊन ब्रिटीश राजवटीतील सुखासीनता त्यांना अनुभवी लागली. ते पेशव्यांचे ताबेदार खरे. पण स्वराज्यांतील नामवंत सरदार असा पटवर्धन घराण्याचो लौकिक त्यांनी मिळविलेला होता. चिंतामणराव यांचे राजकीय जीवन बहुरंगी होते. पेशवाई गेल्यानंतर त्यांनी आपला सरदारी रुबाब आणि स्वाभिमान टिकविण्याचा कायम प्रयत्न केला.

आज सांगली शहरात नव्यानेच पाऊ टाकणाऱ्या सांगलीचे वैभवशाली दर्शन होते. प्रगमनशील सांगली पाहून प्रत्येकाचे मन प्रसन्न होते त्याचे सर्व श्रेय या वैभवाचे शिल्पकार श्रीमंत पहिले चिंतामणाव पटवर्धन यांनाच जाते. जीवनातल्या काही स्मृती पवित्र आणि प्रसन्न असतात. त्यांच्या स्पर्शाने अंतकरण पुलकित होते. भूतकाळ उत्साहाचे उपायन घेऊन वर्तमानाला मिठी घालतो. आपले कर्तव्य करीत असताना काही क्षण त्या स्मृतींच्या सुरभी उद्यानात रमावेसे वाटतात अशा त्या स्मृतींनी श्रमही हलके होतात आणि पुढचा मार्ग अवलंबिण्यासाठी नवे बळ अंगी येते. यावरून आजही असेच म्हणावे लागेल की, पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन हे एक कार्यकुशलता, ध्येयनिष्ठता आणि दूरदृष्टी लाभलेले राजे होते.

राजा हा परमेश्वराचा अंश या पूर्वापार कल्पनेच्या सत्यत्वाचा प्रत्यय या राजेसाहेबांच्या ठिकाणी पूर्णत्वाने येतो. राजा म्हणजे परमेश्वराची विभूती हे जाणण्याची खूण ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेली आहे. 'जेथ जेथ संपत्ति आणि दया। दोन्ही वसति आलिया ठाया । ते ते जाण धनंजया । विभूती माझी ॥ तयाते ओळखावया संज्ञा । जे जगे नमस्कारिजे आज्ञा । ऐसे आधि ते जाण प्राज्ञा ॥ अवतार माझे ॥' या ओव्यांनी श्रीमंत राजेसाहेब यांच्या ठिकाणी असणाऱ्या विभूतिमत्त्वाचे वर्णन केल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही.